06-06-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/5/2025 9:39 PM Page 1



निवडक



गोव्याच्या लगोरी संघात निवड झालेल्या कश्वी, श्रीवाली आणि श्रिया यांच्या सोबत शाळेचे व्यवस्थापक सदानंद डिचोलकर, मुख्याध्यापक सदानंद मिशाळ आणि क्रीडा शिक्षक जय खर्बे

## साखळीतील डॉ. के. ब. हेडगेवार विद्यामंदिरच्या विद्यार्थिनींची जूनियर नॅशनल लगोरी स्पर्धेसाठी निवड

*टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. ५ :** कारापूर तिस्क, साखळी येथील डॉ. के. ब. हेडगेवार विद्यामंदिरच्या विद्यार्थिनींना जूनियर नॅशनल लगोरी स्पर्धेसाठी गोवा संघात निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले आहे. कश्वी वझरीकर, श्रिया अवखळे आणि श्रिवाली नाईक या विद्यार्थिनींनी गोवा लगोरी संघात स्थान मिळवले असून त्या ५ ते ७ जून २०२५ दरम्यान नाशिक (महाराष्ट्र) येथे होणाऱ्या जूनियर नॅशनल लगोरी चॅम्पियनशिप २०२५ मध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

संघातील खेळाडू उच्च आत्मविश्वासाने आणि राज्याला गौरव मिळवून देण्याच्या उद्देशाने रवाना झाले आहेत. संघाचे मार्गदर्शन प्रशिक्षक तन्वेश वेंगुर्लेकर व लक्षिता कवळेकर करत असून, व्यवस्थापक म्हणून प्रशांत वेर्णेकर हे त्यांच्यासोबत आहेत.

शाळेचे व्यवस्थापक सदानंद डिचोलकर व मुख्याध्यापक सदानंद मिशाळ यांनी विद्यार्थिनींचे यशाबद्दल कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. शाळेचे व्यवस्थापन, पालक शिक्षक संघ (झढ) आणि सर्व शिक्षकवर्ग यांनी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कौशल्य आणि क्रीडाभाव दाखवतील, असा विश्वास व्यक्त केला.

# बेंगळुरू चेंगराचेंगरी : बीसीसीआयने जबाबदारी नाकारली

## ११ मृत्युंबाबत राज्य सरकारमार्फत चौकशी करण्याची केली मागणी

**बेंगळुरू, दि. ५ :**

आयपीएल २०२४ च्या विजयानंतर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी)च्या विजय परेडदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाल्यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या कार्यक्रमातील आपली भूमिका पूर्णपणे फेटाळली आहे. बीसीसीआयने स्पष्ट केले की, या विजय सोहळ्याचे कोणतेही आयोजन त्यांच्या संमतीशिवाय आणि पूर्वसूचनेशिवाय झाले होते.

आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की , बेंगळुरूमध्ये होणाऱ्या कोणत्याही विजय परेड अथवा उत्सवाची बीसीसीआयला पूर्वकल्पना नव्हती. आम्हाला माहिती नाही की हे कोणी आयोजित केले होते आणि इतके मोठ्या प्रमाणावर चाहते कसे जमले.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी दिलेल्या माहितीनुसार आयपीएल फायनल आणि पारितोषिक वितरणानंतर बीसीसीआयची जबाबदारी संपते. त्यानंतर फ्रँचायझी आपल्या होम ग्राउंडवर काय करतात यावर बीसीसीआयचा काहीही अधिकार नसतो. आरसीबीला आम्हाला कळविण्याची किंवा आमची परवानगी घेण्याची गरज नव्हती.

धुमल यांनी असेही नमूद केले की, आरसीबी व्यवस्थापन त्या वेळी स्टेडियमच्या आत होते आणि त्यांना बाहेर काय चालू आहे याची कल्पना नव्हती. परिस्थितीची जाणीव होताच त्यांनी कार्यक्रम थांबवण्याचा निर्णय घेतला. मला खात्री आहे की राज्य सरकार आणि स्थानिक प्रशासन या घटनेची गंभीर दखल घेतील.

आरसीबीच्या अधिकृत एक्स (पूर्वीचे ट्विटर) हँडलवर विजय परेडची घोषणा सकाळी ७ वाजता करण्यात आली होती. त्यात म्हटले होते की , बेंगळुरूमध्ये आरसीबी विजय परेड. ही तुमच्यासाठी आहे, १२वी सैनिक सेना. लवकरच अधिक माहिती मिळेल.

यानंतर दुपारी ३:१४ वाजता करण्यात आलेल्या पोस्टमध्ये परेडचा अधिकृत कार्यक्रम घोषित करण्यात आला: ' आज संध्याकाळी ५ वाजता विजय परेड होईल आणि त्यानंतर चिन्नास्वामी स्टेडियममध्ये उत्सव साजरा केला जाईल. सर्व चाहत्यांना पोलिसांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची विनंती आहे.'

मात्र, दुपारी ३:४८ वाजता बेंगळुरू शहर वाहतूक पोलिसांनी विजय सोहळ्याबाबत सूचना जाहीर केल्या, मात्र त्या निवेदनात परेडचा उल्लेख नव्हता. दरम्यान, लाखो





चाहते स्टेडियमबाहेर जमा झाले आणि आत प्रवेश मिळविण्याच्या घाईत चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली.

घटनेनंतर आरसीबीने अधिकृत निवेदन प्रसिद्ध करत मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त केल्या.प्रत्येकाच्या सुरक्षिततेला आम्ही सर्वोच्च प्राधान्य देतो. आरसीबी या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त करते आणि संबंधित कुटुंबियांना मनापासून संवेदना व्यक्त करते. आम्ही त्वरित कार्यक्रमात बदल केले आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन केले, असे निवेदनात म्हटले आहे.

आरसीबी आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनने एकत्रितपणे प्रत्येक मृताच्या कुटुंबाला ५ लाख रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली आहे.

दरम्यान, बीसीसीआयने आयोजकांकडून योग्य नियोजन आणि स्थानिक यंत्रणांशी समन्वय राखण्याची गरज अधोरेखित केली आहे. सैकिया म्हणाले की , अशा प्रकारचे सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करताना स्थानिक कायदा अंमलबजावणी संस्थांशी योग्य समन्वय आवश्यक असतो. अन्यथा अशा दुर्दैवी घटना घडू शकतात.

ही चेंगराचेंगरी घटना केवळ नियोजनातील त्रुटी नसून आयोजक, प्रशासन आणि संबंधित सर्व घटकांनी भविष्यातील अशा दुर्घटनांपासून बचाव करण्यासाठी गंभीर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आहे.

# सुपर–स्ट्रायकर वैभव सूर्यवंशी इंग्लंड दौऱ्यासाठी सज्ज

**नवी दिल्ली, दि. ५ :**

आयपीएल २०२५ मध्ये सुपर–स्ट्रायकर ऑफ द सीझन' पुरस्कार पटकावणारा डावखुरा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याची भारताच्या १९ वर्षांखालील संघात निवड झाली असून, तो आपल्या पहिल्यावहिल्या इंग्लंड दौऱ्यासाठी उत्सुक असल्याचे म्हटले आहे. दौऱ्यातून शिकण्यासह देशासाठी आणखी एक ट्रॉफी जिंकण्याचा निर्धार त्याने व्यक्त केला आहे.

भारतीय १९ वर्षांखालील संघाचा इंग्लंड दौरा २४ जून ते २३ जुलै दरम्यान होणार आहे. या कालावधीत एक ५० षटकांचा सराव सामना, पाच युवा एकदिवसीय सामने आणि दोन मल्टी–डे सामने खेळवले जाणार आहेत.

सूर्यवंशीने प्रसिद्ध झालेल्या व्हिडिओ संदेशात म्हटले, ही एक नवीन स्पर्धा आहे आणि माझ्यासाठी हा एक नवाच अनुभव आहे. मी प्रथमच युनायटेड किंगडममध्ये जात आहे. खेळ आणि तिथल्या वातावरणाबद्दल जाणून घेण्याची ही संधी आहे. आमचा कर्णधार आयुष म्हात्रे यंदाच्या आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून खेळला . संपूर्ण संघाची तयारी जोरात सुरू आहे. आम्ही इंग्लंडमधूनही ट्रॉफी घेऊन परतण्याचा प्रयत्न करू.

सूर्यवंशीने आपल्या आयपीएल



पदार्पणात पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकत सर्वांचे लक्ष वेधले होते. त्याने २०६.५५ च्या विस्फोटक स्ट्राईक रेटने २५२ धावा केल्या. त्याच्या सर्वात लक्षवेधी खेळीपैकी एक म्हणजे गुजरात टायटन्सविरुद्ध ३५ चेंडूत झळकावलेले १०१ धावांचे शतक, जे आयपीएल इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात जलद शतक ठरले.

आयपीएलमध्ये खेळणे हे प्रत्येक खेळाडूसाठी स्वप्नासारखे असते. हा माझा पहिलाच हंगाम होता, पण त्यातून मी खूप सकारात्मक शिकवण मिळाली. पुढच्या हंगामात मी माझ्या संघासाठी काय करू शकतो याचे अधिक चांगले आकलन झाले आहे, असे सांगत सूर्यवंशीने आपल्या आगामी उद्दिष्टांबाबतही स्पष्टता दर्शवली.

मी भूतकाळातील चुका ओळखून त्या सुधारण्यासाठी काम करतो आहे. पुढच्या हंगामात संघासाठी अधिकाधिक योगदान देण्यासाठी मी सज्ज होतो आहे. माझी कामगिरी मागच्यावेळेपेक्षा दुप्पट चांगली असावी, अशीच माझी तयारी आहे, जेणेकरून माझा संघ अंतिम फेरीत पोहोचू शकेल, असे भावनिक आणि आत्मविश्वासपूर्ण वक्तव्य त्याने केले.

# आरसीबीकडून मृत पावलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाखांची मदत

**बेंगळुरू, दि. ५ :**

एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाल्यानंतर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी) संघाने मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. बुधवारी अहमदाबादमध्ये २०२५ इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) विजेतेपद मिळवल्यानंतर झालेल्या विजय जल्लोषात ही दुर्घटना घडली होती. या घटनेत ४७ जण जखमी झाले होते.

आरसीबीने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे, काल बेंगळुरूमध्ये घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे आरसीबी कुटुंबाला खूप वेदना झाल्या आहेत. सन्मान आणि एकतेचे प्रतीक म्हणून, मृतांच्या अकरा कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल. याशिवाय, जखमी चाहत्यांसाठी आरसीबी केअर्स' नावाचा विशेष मदतनिधी तयार केला जात आहे. आमचे चाहते नेहमीच आमच्या प्रत्येक कामाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत.

या घटनेनंतर आरसीबी फ्रँचायझी आणि कर्नाटक राज्य सरकारवर नियोजनाच्या अभावावरून मोठ्या प्रमाणावर टीका झाली आहे.

मंगळवारी संघाच्या ऐतिहासिक विजयानंतर बेंगळुरू शहरात भावनिक वातावरण निर्माण झाले



होते. संघाने तब्बल १८ वर्षांची वाट पाहिल्यानंतर जेतेपद पटकावले होते. मात्र, बुधवारी सकाळीपासूनच विधान सौधापासून एम. चिन्नास्वामी स्टेडियमपर्यंत विजय परेड होणार की नाही, यावर संभ्रम निर्माण झाला होता. आरसीबीच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर सकाळी ७ वाजता परेडबाबत पहिली घोषणा करण्यात आली. पोस्टमध्ये म्हटले होते की , बेंगळुरूमध्ये आरसीबी विजय परेड. हे तुमच्यासाठी आहे, १२ मॅन आर्मी. प्रत्येक जयघोषासाठी, प्रत्येक अश्रूसाठी, दरवर्षी. निष्ठा हीच रॉयल्टी आहे आणि आज मुकुट तुमचा आहे.

त्यानंतर शहर वाहतूक पोलिसांनी परेड होणार नसल्याची अधिकृत सूचना जाहीर केली. पण दुपारी ३.१४ वाजता आरसीबीने पुन्हा परेडची घोषणा करत पोस्ट केली की, आज संध्याकाळी ५ वाजता विजय परेड, त्यानंतर चिन्नास्वामी स्टेडियममध्ये उत्सव. सर्व चाहत्यांनी पोलिसांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे. मर्यादित पास वेबसाइटवर मोफत उपलब्ध आहेत.

परंतु संध्याकाळी वाहतूक पोलिसांनी पुन्हा एक सूचना काढून सत्कार समारंभ' होणार असल्याचे सांगितले, मात्र परेडचा कुठेही उल्लेख नव्हता. त्यामुळे संभ्रम वाढला.

दरम्यान, लाखो चाहत्यांनी चिन्नास्वामी स्टेडियमकडे धाव घेतली आणि प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न करताना गोंधळ उडाला. परिणामी, चेंगराचेंगरी झाली आणि ११ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

या घटनेनंतर संध्याकाळी आरसीबीने शोक व्यक्त केला आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची तातडीची मदतही जाहीर केली.

ही दुर्घटना नियोजनातील गंभीर त्रुटीमुळे घडल्याची जोरदार चर्चा असून, आयोजक व प्रशासन यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे.

# एएफसी आशियाई कप पात्रता फेरीसाठी भारताचा फुटबॉल संघ जाहीर

## छेत्रीच्या नेतृत्वाखाली हाँगकाँगविरुद्ध निर्णायक सामना

**नवी दिल्ली, दि. ५ :**

१० जून रोजी होणाऱ्या एएफसी आशियाई कप पात्रता सामन्यासाठी भारताचा अंतिम २५ सदस्यीय संघ जाहीर करण्यात आला आहे. भारतीय पुरुष राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक मानोलो मार्केझ यांनी बुधवारी हा संघ निश्चित केला. हा सामना हाँगकाँगविरुद्ध खेळवण्यात येणार असून भारतासाठी हा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

याआधी २८ सदस्यीय संघ थायलंडमध्ये सरावासाठी रवाना झाला होता. मात्र थायलंडविरुद्ध ०–२ अशा पराभवानंतर गोलरक्षक ऋतिक तिवारी, बचावपटू मेहताब सिंग आणि सुभाषिश बोस यांना संघातून वगळण्यात आले असून, ते भारतात परतणार आहेत. उर्वरित २५ खेळाडूंनी आता बँकॉकमध्येच थांबत हाँगकाँगविरुद्धच्या सामन्याची तयारी सुरू केली आहे.

भारताने आपल्या पात्रता मोहिमेची सुरुवात मार्च महिन्यात बांगलादेशविरुद्ध गोलशून्य बरोबरीने केली होती. थायलंडकडून झालेल्या पराभवानंतर भारतावर अधिक दबाव निर्माण झाला आहे, कारण गटातील चारही संघ सध्या प्रत्येकी एका गुणावर आहेत.

थायलंडविरुद्धच्या सामन्यात भारतीय



संघाने काही आशाजनक क्षण गाठले होते. मात्र, सुरुवातीला बेंजामिन डेव्हिस आणि नंतर पोरामेट अर्जविलाई यांच्या गोलमुळे सामन्याचे पारडे थायलंडच्या बाजूने झुकले. भारताला बचावातील चुका आणि अपयशी फिनिशिंग यामुळे सामन्यातून हात धुवावे लागले.

भारताचा हाँगकाँगविरुद्ध सामना निर्णायक मानला जात असून, येथे विजय मिळवणे अत्यावश्यक ठरणार आहे.

भारताचा २५ सदस्यीय अंतिम संघ (हाँगकाँगविरुद्ध):

गोलरक्षक: विशाल कैथ, गुरमीत सिंग चहल, अमरिंदर सिंग

बचावपटू: नौरेम रोशन सिंग, राहुल भेके, कोन्शम चिंगलेनसाना सिंग, अन्वर अली, थांगजाम बोरिस सिंग, संदेश झिंगन, आशिष राय, टेकचम अभिषेक सिंग

मिडफिल्डर: सुरेश सिंग वांगजाम, नौरेम महेश सिंग, आयुष देव छेत्री, उदांता सिंग कुमाम, लालेंगमाविया राल्टे (एपीया), लिस्टन कोलाको, आशिक कुरुनियान, ब्रँडन फर्नांडिस, निखिल प्रभू

फॉरवर्ड:सुनील छेत्री (कर्णधार), एडमंड लालरिंदिका, मनवीर सिंग, सुहेल अहमद भट, लल्लियांझुआला छांगटे

मुख्य प्रशिक्षक: मानोलो मार्केझ

# भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी इंग्लंडचा संघ जाहीर

**लंडन, दि. ५ :**

**पहिल्या कसोटीसाठी इंग्लंडचा संघ :**

**बेन स्टोक्स(कर्णधार), शोएब बशीर, जेकब बेथेल, हॅरी ब्रूक, ब्रायडन कार्स, सॅम कुक, झॅक क्रॉली, बेन डकेट, जेमी ओव्हरटन, ऑली पोप, जो रूट, जेमी स्मिथ (यष्टीरक्षक), जोष टंग, ख्रिस वोक्स.**

भारताविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेसाठी इंग्लंडने १४ सदस्यीय संघाची घोषणा केली असून, अष्टपैलू खेळाडू जेमी ओव्हरटनच्या आश्चर्यकारक पुनरागमनाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटीत ओव्हरटनला संधी देण्यात आली असून, त्याच्या फिटनेसवर अद्याप अनिश्चितता कायम आहे.

३१ वर्षीय ओव्हरटनने इंग्लंडकडून आतापर्यंत एकच कसोटी खेळली आहे. २०२२ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या त्या सामन्यात त्याने दोन बळी घेतले आणि फलंदाजीत ९७ धावा करत लक्षवेधी कामगिरी केली होती. त्यानंतर तो प्रामुख्याने इंग्लंडच्या मर्यादित षटकांच्या संघात सहभागी होता. मात्र, वेस्ट इंडिजविरुद्धच्या अलीकडील एकदिवसीय सामन्यांदरम्यान झालेल्या बोटाच्या दुखापतीमुळे तो संघाबाहेर गेला होता.

इंग्लंड ॲण्ड वेल्स क्रिकेट बोर्डाने स्पष्ट केले की, ओव्हरटनच्या फिटनेसचा दररोज वैद्यकीय पथकाकडून आढावा घेतला जाईल. २० जून रोजी हेडिंग्ली येथे होणाऱ्या पहिल्या कसोटीत तो खेळण्यास तंदुरुस्त असेल की नाही, हे पुढील काही दिवसांत ठरेल.

दरम्यान, सरेचा गोलंदाज गस ॲटकिन्सन हा हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे संघाबाहेर गेला आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या कसोटीत झालेल्या दुखापतीमुळे तो अद्याप तंदुरुस्त झालेला नाही.

संघात वेगवान गोलंदाज ख्रिस वोक्स आणि ब्रायडन कार्स यांची पुनरागमनासह निवड करण्यात आली आहे. हे दोघेही हंगामाच्या सुरुवातीस दुखापतीमुळे खेळू शकले नव्हते. सॅम कुक, ज्याने झिम्बाब्वेविरुद्ध शांत पण स्थिर पदार्पण केले होते, त्याच्या जागी वोक्सला प्राथमिकता दिली जाऊ शकते.

विशेष म्हणजे, इंडियन प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूकडून प्रभावी कामगिरी करून परतलेल्या युवा फलंदाज जेकब बेथेलचाही संघात समावेश करण्यात आला आहे. त्याच्या पुनरागमनामुळे टॉप ऑर्डर निवडीबाबत संघ व्यवस्थापनाला नवा विचार करावा लागणार आहे.

बेथेलने न्यूझीलंडमध्ये नोव्हेंबर–डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या कसोटी मालिकेत पदार्पण करताना तिसऱ्या क्रमांकावर तीन अर्धशतके ठोकत सरासरी ५२ ने चमकदार कामगिरी केली होती.

त्याच्या पुनरागमनामुळे उपकर्णधार ऑली पोप आणि सलामीवीर झॅक क्रॉली यांच्यावर दबाव निर्माण झाला होता. मात्र, या दोघांनीही झिम्बाब्वेविरुद्धच्या अलीकडील कसोटीत शतके झळकावून आपले स्थान भक्कम केले आहे.

भारताविरुद्धची हेडिंग्ली कसोटी पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना ठरणार आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २७४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 274 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .